दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 102 ■ गुरूवार दि.22 मे 2025 ■ RNI NO -2023/90078 ■पाने 04 ■किंमत रू 5



# उन्हाळ्यात कोसळधार

## जिल्ह्यात सर्वदूर अवकाळी पावसाचा तडाखा ४० मिमी पावसाची नोंद,वादळाने नुकसान

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहर आणि जिल्ह्यात बुधवारी (दि.२१) दुपारी ३ वाजता सुरू झालेला पाऊस रात्री उशिरापर्यंत सुरूच होता. अनेक भागांत झाडे उन्मळून पडल्याच्या घटना घडल्या, तर वाडी वस्तीवरील अनेक घरांत पाणी शिरल्याने दाणादाण उडाली. विजांच्या धडकी भरवणाऱ्या कडकडाटात अवकाळी पाऊस रात्री उशिरापर्यंत सुरूच होता. धाराशिव शहरात दुपारी सुरु झालेला पाऊस रात्रीपर्यंत संततधारपणे सुरू होता. दरम्यान, आगामी तीन दिवस शहराला 'ऑरेंज अलर्ट'चा इशारा हवामान विभागाने दिला आहे. धाराशिव जिल्ह्यात सात ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे झाडे उन्मळून पडल्याच्या घटना घडल्या. बुधवारी दुपारी ३ च्या सुमारास शहराभोवती काळ्याभोर ढगांनी गर्दी केली आणि ४ नंतर रात्री उशिरापर्यंत कोसळणाऱ्या पावसाने धाराशिवकरांच्या काळजाचा ठोका चुकवला. जोरदार झालेल्या पावसाने शहरातील बहुतांश रस्ते जलमय झाले. अशा पाण्यातून मार्गस्थ होताना दुचाकीस्वारांची मोठी तारांबळ उडाली. शहरात सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. नुकत्याच उद्घाटन झालेल्या बस स्थानकाला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. जिल्ह्यात बुधवारी झालेला पाऊस ४० मिमी पेक्षा अधिक होता. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, २६ मेपर्यंत शहर आणि जिल्ह्यात वादळी वारे, मेघगर्जना, विजांच्या कडकडाटात अवकाळी पाऊस बरसणार आहे. अरबी समुद्रात तयार झालेल्या चक्रीय स्थितीमुळे अतिमुसळधार अवकाळी पाऊस बरसणार आहे. गेल्या एक आठवड्यापासून दुपारनंतर अचानक अवकाळी पाऊस हजेरी लावत आहे. या पावसाने मात्र शहरात चांगलीच दाणादाण उडवून दिली. तुळजापूर येथील सिंदफळ येथील ओढ्याला या पावसाने पाणी आले. तसेच बामणी येथे देखील नदीला पाणी आले आहे. भूम, परंडा आणि उमरगा या तालुक्यात पावसाचे प्रमाण जास्त होते.

### ८० वर्षे जुने वडाचे झाड कोसळले

बुधवारी दुपारी झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे तुळजापूर तालुक्यातील कामठा गावातील एक वडाचे झाड उन्मळून पडले. त्यामुळे त्या झाडाजवळ असलेले दोघेजण जखमी झाले असून एका टू व्हीलरचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कामठा येथील जवळपास ८० वर्षे जुने असलेले वडाचे झाड वादळी वाऱ्याने उन्मळून पडले. या झाडाजवळ उभे असलेले गावातील किरण रोकडे व उमेश माळी हे दोघे जखमी झाले असून या झाडाखाली सापडून एका टू व्हीलर चेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

### तुळजापूरमध्ये भाविकांचे हाल

तुळजापूर शहरात बुधवारी दुपारी अवकाळी पावसाने दुपारी जोरदार हजेरी लावली. शहरात एक ते दीड तास जोरदार पाऊस सुरू होता. तुळजापूर येथे दर्शनासाठी आलेला भाविकांना मात्र या पावसाने मोठा त्रास सहन करावा लागला. पावसामुळे भाविकांना मिळेल तिथे आसरा घ्यावा लागत होता. दरम्यान पावसामुळे मंदिर परिसरात सगळीकडे पाणीच पाणी साचलेले दिसून येत होते.

### विजेचा खेळखंडोबा

धाराशिव शहर आणि परिसरात अवकाळी पावसामुळे वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. दरम्यान, अचानक जोरदार पाऊस पडल्याने झाडांच्या फांद्या तुटणे, तसेच, भूमिगत वाहिन्यांमध्ये पाणी शिरल्यामुळे वीज पुरवठा खंडित होत आहे. शहर आणि परिसरात मागील काही दिवसांपासून विविध भागात अधूनमधून अवकाळी पाऊस पडत आहे. दरम्यान, या अवकाळी पावसाचा जोर जास्त आहे. त्यातही वादळीवारे वाहण्याचे प्रमाणही जास्त आहे. त्यामुळे या पावसात झाडांच्या फांद्या तुटणे, झाडे उन्मळून वीज वाहिन्यांवर पडणे, असे प्रकार वारंवार होत आहेत. मंगळवारी आणि बुधवारी दिवसभर शहरात आणि ग्रामीण भागात विज गायब होती. ग्रामीण भागात विजेची समस्या जास्त गंभीर आहे.




बुधवारी झालेल्या जोरदार पावसाने उमरगा तालुक्यातील बेनीतुरा नदीला पाणी आले होते. पावसाने परिसरात सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे.

# धाराशिव शहरात बलेरो-कारच्या धडकेत ३ जण जखमी

**बेफाम वाहनांना शिस्त लावण्यासाठी गतिरोधक बसविण्याची गरज**

आरंभ मराठी | धाराशिव

शहरातील जिजाऊ चौक ते महात्मा बसवेश्वर चौक मार्गावर काकडे प्लॉट भागात बलेरो आणि कारची समोरासमोर धडक होऊन कारमधील तिघे जखमी झाले. ही घटना बुधवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास घडली. या मार्गावर डांबरीकरणाचे अंतिम काम काही महिन्यापूर्वीच पूर्ण झाले असून, त्यामुळे वाहने बेदरकारपणे धावत आहेत. त्यामुळे अपघात घडत आहेत.या मार्गावर विशेषतः काकडे प्लॉट, माणिक चौक, भोगावती नदीच्या पुलाजवळ, जिजाऊ चौक




परिसरात तातडीने गतिरोधक बसविण्याची मागणी करण्यात येत आहे.जिजाऊ चौक ते महात्मा बसवेश्वर चौक या मार्गावर वाहतूक वाढली आहे. गेल्या काही वर्षापूर्वी या मार्गाचे डांबरीकरणाचे काम करण्यात आले होते.मात्र, कामाचा अंतिम भाग म्हणजे डांबरीकरणाचा शेवटचा लेअर बाकी होता. नागरिकांच्या तक्रारीनंतर या लेअरचे काम काही महिन्यापूर्वी करण्यात आले. आता रस्ता गुळगुळीत झाला असून. त्यामुळे वाहने सुसाट वेगाने धावत आहेत. मात्र यामुळे अपघात वाढले असून, यात सर्वाधिक धोका विद्यार्थ्यांना होऊ शकतो. कारण याच मार्गावर या पूर्वी वेगवेगळ्या अपघातात ४ विद्यार्थ्यांचा बळी गेला आहे. बेफाम वाहनांनी विद्यार्थ्यांना धडक दिल्याने निष्पाप मुलांना जीवाला मुकावे लागले. अपघातानंतर मार्गावर गतिरोधक बसविण्यात आले होते. नव्याने काम झाल्यानंतर गतिरोधक संपुष्टात आले आहेत. सध्या अपघाताची मालिका सुरु झाली आहे. बुधवारी सायंकाळी साडेसहा वाजता बलेरो आणि कारची समोरासमोर धडक झाली. यामध्ये कारमधील ३ जण जखमी झाले आहेत. गाडी ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात आणि प्रचंड वेगामुळे हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. वेगावर नियंत्रण आणण्यासाठी या मार्गावर तातडीने गतिरोधक बसविण्याची गरज आहे. अन्यथा पुन्हा एकदा अपघाताची मालिका सुरू होऊन निष्पाप लोकांना बळीद्यावेलागतील.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची उद्या आढावा बैठक

आरंभ मराठी | धाराशिव

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कामकाजाची आढावा बैठक शुक्रवारी (दि.२३) सकाळी साडेअकरा वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात घेण्यात येणार आहे. बैठकीसाठी महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत जिल्ह्यातील लाभार्थ्यांनी आपल्या अडचणी मांडण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.महामंडळाच्या कर्जवाटपाचा आढावा या बैठकीत घेण्यात येणार असून, कर्जदार लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी, बँकेकडून येणारे अडथळे आदी मुद्द्यांवर यावेळी चर्चा करण्यात येणार आहे. धाराशिव जिल्ह्यात आजवर ५८०० नवउद्योजकांना महामंडळामार्फत कर्ज वाटप करण्यात आले असून, आणखी काही प्रस्ताव महामंडळ तसेच बँकेच्या स्तरावर प्रलंबित आहेत. या प्रस्तावात असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी या बैठकीचे आयोजन



करण्यात आले आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी संदर्भात चर्चा करण्यासाठी संबंधित लाभार्थ्यांनी बैठकीला उपस्थित राहावे,असे आवाहन अण्णासाहेब पाटील विकास फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष खंडू राऊत यांनी केले आहे.

## कुत्र्याला दगड मारला म्हणून जमावाची एकास मारहाण

आरंभ मराठी | लोहारा

कुत्र्याला दगड मारला म्हणून जमावाने एकास बेदम मारहाण केल्याची घटना लोहारा तालुक्यातील कानेगाव येथे घडली. यातील आरोपी साहेब राम करंडे, सविता साहेब करंडे, संतोष साहेब करंडे, सचिन साहेब करंडे (सर्व रा. कानेगाव ता. लोहारा) यांनी दिनांक १९ मे रोजी कानेगाव शिवारातील शेतात (शेत गट नं ११५/२) फिर्यादी गोपाळ अर्जुन कदम (वय ३४ वर्षे, रा. कानेगाव ता. लोहारा) यांना, काठीने तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिली. गोपाळ कदम यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन लोहारा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम २९१, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेस सुरुवात

## सराव सत्रातच वेबसाईट चालेना;३ जूनला अंतिम यादी लागणार

आरंभ मराठी | धाराशिव

अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेलासोमवारी (दि.१९) केंद्रीय पद्धतीने आणि ऑनलाइन प्रणालीद्वारे सुरुवात झाली. पहिल्या दिवशी सराव सत्र होते. परंतु, पहिल्याच दिवशी वेबसाईट व्यवस्थित काम करत नसल्याने सराव सत्रात तांत्रिक समस्या निर्माण झाल्या. प्रत्यक्ष नोंदणी व पसंतीक्रम आजपासून (दि.२१) ते २८ मे दरम्यान नोंदवण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयात मिळून २७ हजार १६० अकरावीची प्रवेश क्षमता आहे. धाराशिव जिल्ह्यात कला शाखेच्या १२ हजार १३० वाणिज्य शाखा ३ हजार ७७० आणि विज्ञान शाखेच्या १० हजार ५६० अकरावी प्रवेश क्षमता आहे. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे




झालेल्या दहावीच्या परीक्षेत जिल्ह्यातील २५ हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अकरावीच्या प्रवेशासाठी शासनस्तरावर जिल्ह्यातील १२६ कॉलेजचे रजिस्ट्रेशन पूर्ण झले आहे. आता आजपासून प्रथम पसंतीक्रमानुसाahttps:// mahafyjcadmissions.in://. या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरायचे आहेत. दिनांक ३० मे रोजी तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येणार आहे. दिनांक ३० मे ते१ जूनपर्यंत हरकती व दुरुस्ती प्रक्रिया होणार आहे. यानंतर दिनांक ३ जून रोजी सायंकाळी ४ पर्यंत अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येणार आहे. दिनांक ५ जून रोजी गुणवत्ता यादीवर आधारित प्रवेश वाटप (शून्य फेरी ) तर दिनांक ६ जून रोजी वाटप केलेल्या महाविद्यालयांची यादी पोर्टलवर लावण्यात येईल. दिनांक ६ ते १२ जूनपर्यंत प्रवेश प्रक्रिया, कागदपत्रे अपलोड व तपासणी होणार आहे. एकाच वेबसाईटवर ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया होणार असल्याने वेबसाईट पहिल्या दिवसापासूनच व्यवस्थित चालत नसल्याने विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत तांत्रिक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे अकरावीसाठी प्रवेशपात्र विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी कागदपत्रे तयार ठेऊन लवकरात लवकर ऑनलाइन नोंदणी करावी लागेल.

# वायर जोडताना वीज आल्यामुळे तरुणाचा शॉक लागून मृत्यू

आरंभ मराठी । मोहा

कळंब तालुक्यातील मोहा येथे बुधवारी (दि.२१) दुपारी दोन वाजेच्या सुमारास एक हृदयद्रावक घटना घडली. रणजीत संजय मडके (वय २०) या तरुणाचा विजेच्या जोरदार धक्क्याने मृत्यू झाला. वीजपुरवठा नसल्यामुळे बोअरवेलचे वायर जोडण्यासाठी तो गेला होता. फ्युजमध्ये मुख्य विद्युत वायर जोडत असतानाच अचानक वीजपुरवठा सुरू झाल्याने त्याला तीव्र झटका बसला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. ही दुर्घटना दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली. वारंवार अपुरी आणि वेळेवर न येणारी वीज ही मोहा परिसरातील शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरली आहे. रणजीतने फ्युजमधील वायर तपासून त्यामध्ये मुख्य वायर जोडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अचानक वीजपुरवठा सुरू झाला आणि त्याला जोरदार विजेचा धक्का बसला. कुटुंबीयांनी आणि गावकऱ्यांनी तत्काळ त्याला कळंब ग्रामीण रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. या अपघातामुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून, कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला



आहे. रणजीत हा शिक्षणाबरोबरच वडिलांना शेतीत मदत करत होता. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### वीज वितरण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

या घटनेनंतर स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांत प्रचंड संतापाची भावना निर्माण झाली आहे. वेळोवेळी वीज वितरण कंपनीला वेळापत्रकानुसार वीजपुरवठा करण्याची विनंती करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. अनेकदा वीज येण्याची कोणतीही पूर्वसूचना दिली जात नाही. परिणामी शेतकऱ्यांचे जीव धोक्यात येतात. तसेच वीजवितरण कर्मचारी कामावर सतत गैरहजर असल्याच्या तक्रारी वारंवार शेतकरी करत आहेत.

# आदिशक्ती मुक्ताईचे शब्दास्त्र



मानवी जीवनात वैचारिक देवाण-घेवाण करणे जीवनाचा अविभाज्य भाग आहे. या वैचारिक आदानप्रदानासाठी जीभ हे प्रभावी माध्यम आहे. जिभेच्या माध्यमातून संवाद कौशल्याने मानवी मनें जशी जोडली जातात तशी तोडलीही जातात. समाजात अनेक लोकं आहेत की, जे सत्ता, संपत्ती,शारीरिक व अन्य बळाच्या जोरावर वाणीचा शब्दांचा वापर करून समाजमन कलुषित करतात. मानवाच्या मनावर शाब्दिक अग्निबाणाद्वारे घाव केले जातात. शरीरावरील घाव बुजविता येतील.पण मनावरचे घाव बुजविता येत नाही. असे घाव घालणाऱ्यांना क्षणभराचा अघोरी आनंद मिळतही असेल. पण त्यामुळे समोरच्याचे न भरून निघणारे मानसिक नुकसान होत असते. आपल्या समाजात सभोवताल असे काही लोकं असतात की, जे सामाजिक हिताच्या उद्देशाने कळकळीने समोरच्याच्या जीवनात अमुलाग्र बदल व्हावा या अपेक्षेने फटकळ बोलतात. अशा फटकळ बोलण्यामागे मानसिक घावाची अपेक्षा नसते,तर अपेक्षा असते परिवर्तनाची. दुःख व अन्यायाने भरडलेल्या समाज मनाच्या परिवर्तनाची. अगदी तशाच फटकळ मनाच्या परिवर्तनाच्या नांदी ठरणाऱ्या संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ, संत नामदेव,संत सोपानदेव यांच्या छोट्या भगिनी संत मुक्ताबाई कडे बघितले जाते.

या भावंडांना संन्यास घेऊन गृहस्थाश्रमात पडल्याने त्यांच्या आई-वडिलांना शास्त्रशरण धर्म मार्तंडांच्या रोषाला सामोरे जावे लागले होते. देहांत शासन भोगुनही शेकडो वर्ष या कुटुंबातील रोष ओसरला नव्हता. आई-वडिलांच्या गुन्ह्याबद्दल एवढीशी मुक्ताई छळ सोसत राहली.संन्यासाची मुलं म्हणून हिणवल्या जाऊ लागली. मानवी जीवन जगण्याच्या हक्कावरील गदा आणण्याचे प्रयत्न झाले. संसारिक आसक्ती पासून निवृत्त झालेल्या सर्वसंग परित्याग केलेल्या निवृत्तींनाही अपमानित जीवन जगण्याने वैफल्यग्रस्त व्हायचे. अशावेळी ज्ञानेश्वरांनाही सावरण्याची जबाबदारी इवलीशा मुक्ताबाईकडे आली. निवृत्तीनाथांना सावरणाऱ्या ज्ञानेश्वरांनाही नित्य अपमान व समाज रोषामुळे मनस्ताप व्हायचा. अशा उव्देगातून मुक्त होता आलेच नाही.

सेच एकदा ते रुसले.समाजाद्वारे संन्यासाची मुलं अशा शब्दात हिणावल्या जाऊ लागली. असाहय अपमान पचविता आला नाही. रागारागाने पर्णकुटीत जाऊन बसले. आपले अपशकुनी तोंड कोणालाही दाखवायचे नाही. बाहेर पडायचे नाही. शब्दांचा आघात सहन करायचे नाही. किंबहुना तशी संधी कोणाला मिळू नये.बराच वेळ झाला ज्ञानेश्वर दिसेना म्हणून त्यांचा शोध घेण्यासाठी धाकटी बहीण मुक्ताबाई शेवटी अनवाणी पायाने शोधासाठी हिंडत राहिली. त्यावेळेस मुक्ताबाईचे वय जेमतेम सहा वर्षाचे असेल. मुक्ताबाई पर्णकुटी कडून परत आली. आत जाण्यापूर्वी दार ढकललं. तिने ढकलून पाहिले तरी उघडल्या गेले नाही. आतल्या माणसाने कोण आले याची चौकशी केली नाही. तिसऱ्या प्रयत्नाच्या वेळेस तिने आतून विचारले. '' कोण? '' बाहेरून उत्तर आले '' मी '' तो आवाज ज्ञानदादाचा होता. तिने दार उघडण्याची विनंती केली. पर्णकुटीतून तीव्र स्वरात उत्तर आले. '' कशाला उघडायचे दार, बाहेरच्या जगाला दुर्दैवी तोंड दाखविण्यासाठी..? त्यांच्याकडून अपमानाचे वार सहन करण्यासाठी? आता पुढे शक्य नाही..!'' अवघ्या सहा वर्षाच्या मातृ-पितृछत्र हरवलेल्या मुक्ताईने आकांत केला. ती आपल्या ज्ञानदादाला विनवू लागली. ''मजवरी दया करा ताटी उघडा ज्ञानेश्वरा..!'' कोवळ्या मनाची व वयाची मुक्ताई अनेक युक्तिवाद करू लागली. निवृत्तीनाथांच्या बाबतीत ज्ञानेश्वर मोठे झाले, तर ज्ञानेश्वरांच्या बाबतीत मुक्ताबाई मोठी झाली. मुक्ताबाईने जे समर्पक दृष्टांत दिले ते ताटीचे अभंगातून स्पष्टचं होतात. '' संत जेणे व्हावे तेणे बोलणे सोसावे विश्व जगी झाले वन्ही शांती सुखी व्हावे पाणी '' ताटीचे अभंगातून मुक्ताई ज्ञानदादाला बोध करू लागली. '' जगातल्या असुयेचे, द्वेष भावनेचे बोलणे पचवून टाक.याच जगावर वरपांगी नव्हे,तर मनापासून प्रेम करण्यास प्रवृत्त होणे ही संतत्वाची पहिली अट आहे. जग अग्नी झाले तर प्रतिअग्नी होऊन उत्तर द्यायचे नसते. तर त्या ठिकाणी पाण्याचे रूप घेणे अत्यंत गरजेचे ठरते. संतत्वाचा मोह होणे सुलभ आहे. पण त्याकरिता घ्यावे लागणारे परिश्रम अवघड आहे. ''

वयाने कनिष्ठ आणि अधिकाऱ्यांनी श्रेष्ठ असलेल्या मुक्ताईने उपदेश फक्त दोघांनाच केला आहे.पहिला म्हणजे ज्ञानदेवांना तर दुसरा चांगा वटेश्वरांना अर्थात ते त्यांचे शिष्य होते.याप्रमाणेच मुक्ताबाईच्या फटकळपणाचा सामना इतरही संतांना करावा लागला. मुक्ताबाईंनी योगीराज चांगदेवांना उद्देशून काही अभंग रचना लिहिलेल्या आहेत.मुक्ताबाई कृत आध्यात्मिक अंगाई गीत (पाळणा) मध्ये पुढील वर्णन आलेले आहे. '' निर्गुणाच्या डहाळी पाळणा लाविला तिथे सूत पडला मुक्ताईचा निज निज बाळा न करी पै आळी अनुहात टाळी वाजवीतो '' उपरोक्त अभंगातून संत मुक्ताबाई गुरुमाऊलीच्या भूमिकेत स्पष्ट होतात.

निवृत्तीनाथ,ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई ही चार भावंडे तर चांगा वटेश्वर, गोरोबा काका, चोखामेळा, नामदेव, जनाबाई ही समकालीन संत मंडळी होती. ज्याप्रमाणे संत ज्ञानेश्वर व चांगावटेश्वर यांच्याशी सुसंवाद आहे. अगदी त्याचप्रमाणे मुक्ताबाई व नामदेव यांच्यामध्ये सुद्धा आहे. '' अखंड देवाला जयाचा शेजारकारे अहंकार नाही गेला कल्पतरू तळवटी इच्छिते ते गोष्टी समज अवघाची नरोटी राहिली का मने मुक्ताई माजले की कोरे कोणते उत्तर सत्य मानू '' ज्यावेळी मुक्ताईने नामदेवांना नमस्कार केला. पण नामदेवाने प्रतिवंदन केलेच नाही. नामदेवांचा अहंकार पाहून मुक्ताबाईंनी नामदेवाची कान उघडणी केली. त्याप्रसंगीचा उपरोक्त अभंग आहे. साक्षात पंढरपूरच्या विठ्ठला जवळ नामदेवाचे वास्तव्य होते. पण त्याचाच अहंकार नामदेवांना झाला होता. म्हणून अधिकार श्रेष्ठ मुक्ताईने उपरोक्त शब्दात नामदेवांना खडसावले. वडीलधाऱ्या नामदेवांना लहानशा मुक्ताईने आत्मदृष्टीची वाट दाखविली.

लोकोत्तर पुरुष लोकात राहूनच फाट कार्य करतात. समाजातील दारुण विद्रोहाला संतत्वाने जिंकता येते याची जाणीव सर्वप्रथम मुक्ताबाईला झाली. मुक्ताबाईला आदिशक्ती ही म्हणतात. भावाच्या कर्तुत्वाविषयी सार्थ अभिमान या दोन्ही भावनेने ताटीचे अभंग आहेत. योगी चांगदेव व योगी ज्ञानदेवांना योगिनी म्हणून मुक्ताबाई ने उपदेश केला . नामदेवांना अहंकाराची जाणीव करून दिली. संत निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान देव, आणि मुक्ताबाई या चार भावंडात निवृत्तीनाथ व ज्येष्ठ आहेत आणि मुक्ताबाई या सर्वांत लहान आहेत. '' निवृत्ती..ज्ञानदेव.. सोपान मुक्ताबाई.. ''

अशी ही चार भावंडाची श्रेयनामावली आहे . जणू परमार्थिक प्रवासातले हे चार टप्पेच आहे.. आधी निवृत्तीची कास धरावी. प्रपंचातून मन निवृत्त करावे. त्यानंतर ज्ञानाची उपासना करावी. नंतर भक्ती पुढची पायरी आहे. तिच खरा उपासना आहे. नंतर भक्ती पुढची पायरी आहे,तोच खरा सोपान आहे. या मार्गाने गेल्यावर मुक्ती किंवा मोक्ष प्राप्त होतो.या चार नाममुद्रेतून सुचित होणारा संदेश मानवासाठी अत्यंत मोलाचा आहे..

फटकळपणे बोलून समोर त्याच्या मनावर आघात करणारे भरपूर लोकं समाजात आहेत. पण मुक्ताईप्रमाणे उघडपणे बोलून समोरच्याच्या मनातील विकार काढून टाकणारे फार कमी आहे. योग्य मार्गावर समाजाला चालवण्याचा बोध हे केवळ संतच करतात. तद्वतच संतही कलीयुगी ओळखता आले पाहिजे..!

शशिकांत मधुकर तोटे
बारीपुरा दारव्हा,
जिल्हा.यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

## मुलाचा गंभीर आजार लपवून लग्न करून मुलींची फसवणूक; चौघांवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | धाराशिव

गंभीर आजाराची कल्पना न देता तरुणीशी विवाह करून फसवणूक केल्याप्रकरणी विवाहितेने दिलेल्या फिर्यादीवरून पतीसह कुटुंबातील चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी हर्षल अरुण भावसार (वय ३३ वर्षे), मंजुश्री अरुण भावसार (वय ६० वर्षे), वैशाली रविनंदर भावसार (वय ३८ वर्षे), रविनंदन सुभाष भावसार (वय ४३ वर्षे) (सर्व रा. वाकड, पिंपरी चिंचवड पुणे) यांनी दिनांक २८ नोव्हेंबर २०२२ पासुन गुंजोटी येथे फिर्यादी श्रध्दा हर्षल भावसार (वय ३२ वर्षे, रा. प्रभाकर नगर बाहेरपेठ गुंजोटी, ता. उमरगा) यांना आरोपींनी संगणमत करून गंभीर आजार असल्याचे लपवून खोटे बोलून फिर्यादी व आरोपी हर्सल यांचे लग्न दिले. मुलाला असणाऱ्या गंभीर आजाराची माहिती न देता फिर्यादी व फिर्यादीच्या आई वडीलांची फसणुक केली. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग उमरगा यांचे जाक्र १२७०/२०२५ दि.१७.०५.२०२५ सी.आर.पी.सी. १५६ (३) अन्वये प्राप्त माहितीवरून फिर्यादी श्रध्दा भावसार यांनी २० मे रोजी दिलेल्या खबरेवरुन उमरगा पोलिसात गुन्हा नोंदवला आहे.

## शेतरस्त्यांसाठी बेंबळी येथे उद्या सस्ती अदालत उपक्रम

आरंभ मराठी | धाराशिव

विभागीय आयुक्तांच्या निर्देशानुसार शेतरस्ते व पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण दूर करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ''सस्ती अदालत'' उपक्रम विभागातील आठही जिल्ह्यांमध्ये सुरू करण्यात आला आहे. सामान्य शेतकऱ्यांना वेगाने न्याय मिळावा, प्रकरणांचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी ''सस्ती अदालत'' आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत उद्या (दि.२३) सकाळी ११ वाजता, नामानंद मंगल कार्यालय, पेट्रोल पंपासमोर, बेंबळी येथे बेंबळी मंडळातील शेतरस्त्यांच्या संदर्भात सस्ती अदालत आयोजित करण्यात येणार आहे.

## रेल्वे स्थानकाचे नाव बदलले

### आता उस्मानाबादऐवजी धाराशिव रेल्वे स्टेशन

### खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रयत्नांना यश



आरंभ मराठी | धाराशिव

महाराष्ट्र शासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार उस्मानाबाद या रेल्वे स्थानकाचे नाव बदलून धाराशिव असे करण्यास केंद्र सरकारकडून पुढील प्रक्रिया सुरू झाली आहे. गृह मंत्रालयाच्या २ डिसेंबर २०२४ च्या पत्रानुसार, या नाव बदलाच्या प्रस्तावावर भारतीय सर्वेक्षण विभागाची टिप्पणी मागवण्यात आली होती. यानंतर देखील उस्मानाबाद रेल्वे स्थानकाचे धाराशिव असे नामांतर करण्याबाबत संथ गतीने प्रक्रिया सुरू होती. यानुषंगाने खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी रेल्वेच्या वरिष्ठ अधिकारी सह बैठक घेऊन सदर स्थानकाचे नाव धाराशिव असे नामांतरित करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सूचित केले होते तसेच केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडून पत्राव्दारे पाठपुरावा केला होता.त्यानुसार केंद्र शासनाने उस्मानाबाद रेल्वे स्थानकाचे नामांतर धाराशिव असे करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.या निर्णयामुळे धाराशिव या प्राचीन ऐतिहासिक शहराला पारंपरिक ओळख मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, स्थानिक नागरिकांमध्ये या निर्णयाचे स्वागत होत आहे.


## दस्तापुर येथील खून प्रकरणाचा मुरूम पोलिसांकडून ४८ तासांत उलगडा; एक आरोपी ताब्यात

आरंभ मराठी | मुरुम

मुरुम शहर पोलीस ठाणे हद्दीतील सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर दस्तापूर येथे घडलेल्या खूनप्रकरणाचा ४८ तासांत छडा लावण्यात मुरुम पोलिसांना यश आले आहे. सोमवारी (ता.१९ मे) रोजी शमशोद्दीन मियासाहेब पटेल यांचा निर्घृण खून झाल्यानंतर पोलिसांनी प्रचंड मेहनत घेऊन एका संशयित आरोपीला ताब्यात घेतले असून दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. सविस्तर वृत्त असे की, सोमवारी (ता.१९ मे) रोजी दस्तापुरजवळील पादचारी पुलाजवळ एक बोलेरो वाहन संशयास्पद स्थितीत उभे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. घटनास्थळी पोहोचताच गाडीच्या शेजारी मृतदेह आढळून आला. तो मृतदेह दाळिंब येथील शमशोद्दीन मियासाहेब पटेल (५६ वर्षे) यांचा असल्याचे निष्पन्न झाले. मृताच्या डोक्यावर गंभीर मारहाण केल्याचे आढळून आले. सुरुवातीला हा अपघात असल्याचा बनाव करण्यात आला होता.

कोणीही प्रत्यक्षदर्शी नसल्यामुळे तपास अत्यंत गुंतागुंतीचा होता. मात्र पोलिस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक शफाकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद ईज्ञपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप दहीफळे, अमोल मोरे, सचिन खटके, पोलीस अंमलदार विनोद जानराव, बबन जाधवर, नितीन जाधवर, जावेद काझी, दयानंद गादेकर, समाधान वाघमारे, चालक विजय घुगे, सुभाष चौरे आदींनी संयुक्तपणे तपास सुरू केला. सततचा पाऊस व वीजपुरवठ्यातील अडथळ्यांमुळे सीसीटीव्ही फुटेज मिळविण्यात अडचणी येत होत्या.

## वळीवाचा पाऊस : लाभदायक की नुकसानकारक?



मान्सून दाखल होण्यापूर्वी येणाऱ्या पावसाला आपण वळीव पाऊस म्हणून ओळखतो. वळीव पाऊस राज्यनिहाय वेगवेगळ्या नावाने ओळखला जातो. महाराष्ट्रात त्याला ''आम्रसरी'' किंवा ''वळवाचा पाऊस'' म्हणतात. हा पाऊस आंबा पिकास मानवतो म्हणून त्याला ''आंबेसरी'' असेही म्हणतात.मेच्या शेवटी व जूनच्या प्रारंभी केरळ व कर्नाटक राज्यांत वादळी वाऱ्यासह पडणाऱ्या या पावसाला ''चेरी ब्लॉसम पाऊस'' म्हणतात. पश्चिम बंगालमध्ये या पावसास ''नॉर्वेस्टर'' असे म्हणतात. हा पाऊस कॉफी पिकासाठी उपयुक्त असल्याने त्यास ''कॉफी बहार सरी'' असेही म्हणतात. उत्तर प्रदेशमध्ये ''आँधी'' या नावाने हा पाऊस ओळखला जातो.

सध्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी वळीव पाऊस आपले रौद्ररूप दाखवत आहे. काही बाबतीत हा पाऊस नुकसानकारक ठरतो. मोठ्या वादळ वाऱ्यासह येणाऱ्या या पावसामुळे झाडे उन्मळून पडतात, विजेचे खांब कोसळतात आणि विजेचा लपंडाव सुरू होतो. घरावरील पत्रे उडून जातात आणि अनेकांचे संसार उघड्यावर पडतात. अचानक वीज कोसळल्यामुळे जीवितहानी झाल्याच्या घटनाही घडतात. शेतात काम करणाऱ्या एखाद्या शेतकऱ्याचा अथवा जनावर राखणाऱ्या गुराख्याचा वीज कोसळून मृत्यू झाल्याच्या घटना हळहळ वाटणाऱ्या ठरतात. एका सर्वेक्षणानुसार दरवर्षी वीज कोसळून सुमारे २५०० लोकांचा मृत्यू होतो. विजांचा कडकडाट होत असेल तर काय केले पाहिजे, याबाबत शासनाकडून वेळोवेळी मार्गदर्शिका प्रसिद्ध केल्या जातात. मार्गदर्शिकेनुसार: घरात असाल तर दरवाजे व खिडक्यांपासून दूर राहा. पाण्याशी संबंधित कोणतेही काम करू नका. इलेक्ट्रिक उपकरणांचा वापर करू नका. हातात छत्री असेल तर ती बंद करा. मोकळ्या मैदानात झाडांपासून दूर उभे राहा. शेतात काम करत असाल आणि सुरक्षित ठिकाणी आसरा घेण्यासाठी वेळ नसेल, तर दोन्ही पाय गुडघ्याजवळ घेऊन खाली बसा आणि कानांवर हात ठेवा. विजा चमकत असताना तुम्हाला विद्युत प्रभार जाणवला, अंगावरील केस उभे राहिले, त्वचेला मुंग्या किंवा झिणझिण्या आल्या, तर तुमच्यावर वीज कोसळण्याची शक्यता असते. अशावेळी त्वरित जमिनीवर आडवे व्हा किंवा गुडघ्यात मान घालून बसा. धरणे, तलाव अशा पाण्याच्या ठिकाणांपासून लांब राहा. जवळ एखादी लोखंडाची किंवा तांब्याची वस्तू असेल, तर ती दूर ठेवा. पाऊस व वीज होत असताना बाहेर असाल आणि एखादी इमारत जवळ नसेल, तर झाडाखाली उभे राहू नका, कारण मोठी झाडे वीजेला आकर्षित करतात. असं असलं तरी उन्हाच्या कहराने हैराण झालेल्या जीवांना या पावसाने दिलासा मिळतो. ढगाळ वातावरणात तुफान पाऊस होत असल्यामुळे सर्वांना पावसाळ्याची अनुभूती मिळू लागते. हवेत गारवा निर्माण झाल्याने प्रचंड उष्णतेने त्रासलेले लोक सुखावतात. खरीपपूर्व मशागतीसाठी हा पाऊस पोषक असल्यामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होते. पावसाळ्यापूर्वीची संपूर्ण नालेसफाई पूर्ण झाली नसल्यामुळे काही ठिकाणी पाणी तुंबून वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. रोहिणी नक्षत्र २५ मेपासून सुरू होणार असतानाच वळीव पावसाची जोरदार सुरुवात झाल्याने शेतकरी वर्ग सुखावला आहे. मात्र, मशागतीची काही कामे या पावसामुळे खोळंबली गेली आहेत. मागील दोन दिवसांपासून सलग पावसामुळे हवेतील उष्णता कमी झाली आहे.वैशाख वणवा यंदा असह्य झाला होता. साधारणतः कमाल तापमान सर्वत्र ४० अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. वळीव पावसामुळे आता ते ३०३२ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले आहे.

काहींना सुसह्य, तर काहींना असह्य वाटणाऱ्या वळीव पावसासारख्या घडामोडी निसर्गात मोठ्या प्रमाणात होत असतात. मानवाने निसर्गावर कुरघोडी करण्यास सुरुवात केल्यामुळे त्याचा प्रकोप देखील अनुभवास येतो.



किशोर
जाधव,सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

## अवकाळी तडाख्यात शेतीचे नुकसान,मदतीसाठी तातडीने अहवाल सादर करण्याच्या आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यात सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेती, फळबागा, घरे, जनावरे व इतर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मागील दोन दिवसांपासून जिल्ह्यातील विविध भागांत वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून, नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून वस्तुनिष्ठ अहवाल शासनाकडे पाठवावा अशा सूचना आमदार पाटील यांनी यावेळी केली.वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसाने धाराशिव तालुक्यातील महादेव माळी या शेतकऱ्याच्या काढणीस आलेल्या टमाट्याच्या बागेचे मोठे नुकसान झाले आहे.याचप्रमाणे जिल्ह्यातील अनेक भागात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. याशिवाय अनेक भागांत घरांची पडझड झाली असून, जनावरांचे मृत्यू, वीजपुरवठा खंडित होणे, शेती पाण्याखाली जाणे आदी गंभीर प्रकार समोर आले आहेत.या पार्श्वभूमीवर 'मित्र'चे



उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे नुकसानग्रस्तांची तातडीने दखल घेऊन महसूल व कृषी विभागामार्फत पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना तातडीने आर्थिक मदत मिळावी यासाठी वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याबाबत हा प्रशासनाला सूचना दिल्या असल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली आहे.

# पीक विमा योजनेतील ८०-११० मॉडेलनुसार कंपनीकडून १३१३ कोटी तत्काळ वसूल करा

## विमा अभ्यासक अनिल जगताप यांनी मुख्यमंत्र्याकडे निवेदनाद्वारे मागणी

आरंभ मराठी | धाराशिव



प्रधानमंत्री पिक विमा योजनेतील ८० – ११० मॉडेल नुसार पिक विमा कंपनीकडून राज्य शासनाला येणे प्रलंबित असलेली १३१३ कोटी रुपये रक्कम पिक विमा कंपनीकडून त्वरित वसूल करावी अशी मागणी पीक विमा अभ्यासक आणि याचिकाकर्ते अनिल जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्य शासनाने सन २०२० –२१ पासून राज्यात ८० –११० चे मॉडेल स्वीकारले असून ते बीड पॅटर्न म्हणून देखील प्रसिद्ध आहे. या मॉडेलद्वारे पिक विमा कंपनीकडून राज्य शासनाला किती परतावा रक्कम येणे बाकी आहे व ११०% पुढील पिक विमा कंपनीला किती रक्कम देणे बाकी असल्याबाबत कृषी आयुक्त पुणे यांच्याकडे अनिल जगताप यांनी माहिती मागवली होती. त्यांना दिलेल्या माहितीत १३१३ कोटी रुपये पिक विमा कंपन्याकडून येणे बाकी असल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. तर राज्य शासन ११० टक्केच्या पुढील केवळ २४७ कोटी रुपये रक्कम देणे बाकी आहे. ८० –११० मॉडेल नुसार जर एखाद्या कंपनीला १०० कोटी रुपये हप्ता दिला गेला असेल व कंपनीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई ७५ कोटी रुपये दिली गेली असल्यास २०% अर्थात वीस कोटी




रुपये कंपनी स्वतःकडे ठेवून घेते व पाच टक्के अर्थात पाच कोटी रुपये कंपनीला राज्य शासनाला परत करावे लागतात. तसेच राज्य शासनाकडून शंभर कोटी रुपये कंपनीला हप्ता असल्यास ११० कोटी रुपये नुकसान भरपाई झाली तर दहा टक्के कंपनीला स्वतःचे घालून ११० कोटी रुपये शेतकऱ्यांना द्यावे लागतात. तसेच नुकसान भरपाई जर ११०% च्या पुढे असल्यास पुढील रक्कम राज्य शासन देते. सन २०२०– २१ ते २३– २४ रब्बी पर्यंत ८० – ११० मॉडेल नुसार राज्य शासनाला विविध पीक विमा कंपन्याकडून परतावा रक्कम अपेक्षित ३४०३ कोटी ५२ लाख इतकी होती. यातील २०९० कोटी २६ लाख रुपये प्राप्त झाले असून अद्यापही विविध पीक विमा कंपन्याकडे कंपनीकडे प्रलंबित १३१३ कोटी २६ लाख रुपये येणे बाकी असल्याची धक्कादायक माहिती प्राप्त झाली आहे. ८० – ११० मॉडेल नुसार विमा कंपनीला ११०% पेक्षा राज्य शासन जास्तीची नुकसान भरपाई रक्कम २४०५ कोटी ८९ लाख इतकी होती. त्यातील २१५८ कोटी रुपये वितरित केले असून अद्याप २४७ कोटी रुपये पिक विमा कंपनीला वितरित करणे बाकी आहे. कंपनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देताना हात आखडता घेते. मात्र राज्य शासनाची कंपनीकडे पिक विमा हप्त्याच्या माध्यमातून दिली गेलेली व अडकून पडलेली मोठी रक्कम राज्य शासनाने त्वरित वसूल करणे गरजेचे आहे. त्या रकमेची वसुली त्वरित पिक विमा कंपनीकडून करावी अशी विनंती अनिल जगताप यांनी निवेदनात केली आहे.

# बालाजी तांबे यांना राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार प्रदान



आरंभ मराठी | धाराशिव

येथील शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि साहित्य चववळीतील व्यक्तिमत्व बालाजी तांबे यांना एकता सेवाभावी संस्थेच्या वतीने राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार २०२५ देण्यात आला . पुरस्कार वितरण सोहळा मुंबई येथील मराठी पत्रकार भवन सभागृहात मंगळवारी शिक्षक आमदार विक्रम वसंतराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली व सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ सिने अभिनेता अली खान, ज्येष्ठ सिने अभिनेत्री उषा नाडकर्णी,माजी आमदार रामराव वडकुते, मुश्ताक अंतुले,सतीश सस्ते, वैभव वर्मा,सलीम सारंग, ॲड. पवन निकम, वसीम बुऱ्हाण आयोजक व संस्था अध्यक्ष अमजत खान,अरुण मराठे, रमाकांत कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. एकता सेवाभावी संस्था ही उत्कृष्ट काम करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान म्हणून हा पुरस्कार दरवर्षी देत आहे. पुरस्काराबद्दल तांबे यांचे अभिनंदनहोतआहे.

# इचलकरंजीच्या डीकेटीईच्या आठ विद्यार्थ्यांची रिलायन्स इंडस्ट्रीज कंपनीमध्ये निवड



आरंभ मराठी | कोल्हापूर

इचलकरंजी येथील डीकेटीईच्या टेक्स्टाईल विभागातील आठ विद्यार्थ्यांची देशातील नामवंत अशा रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनीच्या पॉलिस्टर डिव्हिजनमध्ये उत्तम पॅकेजसहीत निवड झाली आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये डीकेटीईचे निवड झालेले विद्यार्थी विविध पदांवर रुजू होणार आहेत. रिलायन्स कंपनी टेक्स्टाईल आणि पॉलिस्टर उत्पादनात देशभरात अग्रगण्य कंपनी म्हणून ओळखली जाते. यावर्षी रिलायन्स इंडस्ट्रीमार्फत आयोजित रिटन टेस्ट, पर्सनल इंटरव्हयू अशा अनेक फे–यामधून विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता चाचणी घेण्यात आली आणि विद्यार्थ्यांचे एकूणच शैक्षणिक गुणवत्ता यावरून आठ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. रिलायन्स कंपनीमध्ये निवड झालेले डीकेटीई टेक्स्टाईलचे विद्यार्थी असे – विशाल जानकर, रत्नदीप मुधाळे, राहुल कसाले, कमलकिशोर चौधरी, अथर्व तोडकर, सचिन चव्हाण, अदित्य कांबळे व दर्शन देसाई.संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ. सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे तसेच सर्व ट्रस्टी यांनी अभिनंदन केले. संस्थेच्या संचालिका प्रा. डॉ. सौ. एल. एस. आडमुठे, उपसंचालक प्रा. डॉ. यु. जे. पाटील, टीपीओ प्रा. एस. बी. अकिवाटे यांचे मार्गदर्शन लाभले.

# आजी-माजी सैनिक संघटना, येडेश्वरी क्लासेसच्या वतीने गुणवंतांचा सत्कार

आरंभ मराठी | येरमाळा

कळंब तालुक्यातील येरमाळा येथील आनंदधाम सभागृहात आजी–माजी सैनिक संघटना व येडेश्वरी कोचिंग क्लासेस च्या वतीने दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार सोहळा पार पडला .शनिवारी आनंदधाम सभागृहामध्ये येरमाळा येथील व परगावी शिकत असलेल्या दहावीच्या परिक्षेत ८० टक्केच्या पुढील गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार व सन्मान संपन्न झाला.यशस्वी विद्यार्थ्यांना शॉल, पुष्पगुच्छ व ट्रॉफी देण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून धाराशिवचे डॉ. अभिजीत घोळवे व विनोद गादेकर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सैनिक अनिल पवार तर प्रमुख उपस्थिती म्हणून मा.पं.सं. सभापती विकास बारकुल, उपसरपंच गणेश बारकुल,प्रा.सुनिल पाटील, समाधान बेदरे, शिवाजी पौळ, लहु बारकुल, कुमार बारकुल, विशाल बारकुल, संतोष तौर, राहुल पाटील, मदन बारकुल, माजी सैनिक मनोज बारकुल, नागनाथ बारकुल, लिंबराज कोकाटे, रशिद शेख, अल्लाउद्दीन शेख, फुलचंद कागदे, संजय बारकुल, युवराज शिंदे आदी उपस्थित होते.सर्वप्रथम संतोष आगलावे यांच्या येडेश्वरी कोचिंग क्लासेस मधील विद्यार्थीनी सानवी सुखदेव बारकुल हिचा ९८ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला त्याबद्दल व अंतरा संतोष जाधव दिचा ९७ टक्के गुण मिळवून व्दितीय क्रमांक मिळविल्याबद्दल पालकांसह सत्कार करण्यात आला .त्यानंतर सानवी बारकुल, ऋतुजा बारकुल, प्राची राउत, विभावरी जाधव, श्रेया दिवाणे, सई गायकवाड, स्नेहल पवार, जोया शेख, अनुष्का उमेश बारकुल, अनुष्का वसंत बारकुल, प्रांजली मुंडे, आशिया ईनामदार,अनुष्का मनोज बारकुल, प्रारब्धी माढेकर, अक्षदा दिवाणे, सुजाता पवार, गौरी



साबळे, दिव्या पायाळे, शिवानी मुंडे, ऋजुला पायाळे, अभिजीत उघडे, वैष्णवी पाटील, राजकन्या खैरमोडे, आरती पौळ, सिद्धी मस्के, प्रिती लाटे, अमृता चव्हाण, विराज होळे, मैनोद्दीन तांबाळी, सुशांत सावंत, पृथ्वीराज देशमुख, अक्षदा वणवे, रेणुका उघडे, गायत्री मैंदर्गीकर, अक्षता बारकुल, वैष्णवी कागदे, मनस्वी शिनगारे, वैष्णवी बारकुल, श्रेया बारकुल, प्रांजली पतंगे, ऋषिकेश बारकुल, संकेत शिंदे, पवन गायके, स्वराज बारकुल या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी येडेश्वरी कोचिंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे संतोष आगलावे, पांगरकर सर, अमर पाटील, शरद बारकुल, अनिल शिंदे यांचा सत्कार पालकांकडून करण्यात आला . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांगरकर सर यांनी केले, प्रास्ताविक संतोष आगलावे यांनी तर आभार समाधान बेदरे यांनी मानले . सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे येरमाळा पंचक्रोशीतून कौतुक करण्यात येत आहे.

# अचलेर येथील हिरेमठ संस्थानमध्ये नेत्र तपासणी शिबिर उत्साहात

आरंभ मराठी | आलूर

लोहारा तालुक्यातील अचलेर येथील हिरेमठ संस्थान येथे लि.श्री.ष.ब्र. सुतरेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या पुण्यस्मरणोत्सव सोहळा कार्यक्रमानिमित्त सुरू असलेल्या विविध उपक्रमा अंतर्गत मंगळवारी (दि.२०) अचलेर येथे लायन्स क्लब सोलापूर व हिरेमठ संस्थान अचलेर यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले.या शिबिराच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अचलेर हिरेमठाचे मठाधिपती अभिनव सुतरेश्वर शिवाचार्य महाराज होते. यावेळी लायन्स क्लब सोलापूर चे अध्यक्ष दिनेश बिराजदार, सचिव सचिन पाटील, डॉ. महासिद्ध म्हमाने, सुरज जाधव, ज्ञानेश्वर कलकेरी, लताबाई औसेकर, अचलेर गावचे सरपंच कांताबाई सुभाष सोलंकर, डॉ.शिला स्वामी यावेळी उपस्थित होते. या शिबिराचे उद्घाटन अभिनव सुतरेश्वर शिवाचार्य महाराज व लायन्स क्लब सोलापूर तर्फे करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजशेखर स्वामी यांनी केले. सर्व उपस्थितांना प्रा.डॉ शिला स्वामी, लायन्स क्लबचे




अध्यक्ष दिनेश बिराजदार, सचिव सचिन पाटील यावेळी मार्गदर्शन केले.यावेळी अचलेर गावातील नागरिकांनी या नेत्र तपासणी शिबिरामध्ये सहभागी होऊन आपली नेत्र तपासणी करून घेतली. गावातील १६५ नागरीकांनी या नेत्र तपासणी शिबिराचा लाभ घेतला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जगदीश सुरवसे यांनी केले तर आभार प्रदर्शन मल्लय्या स्वामी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवानंद सरसंबे, हणमंत कदारे, संजय कुनाळे, गिरीश पाटील, विकास स्वामी, संदीप पाटील, सुत्रय्या स्वामी, प्रविण स्वामी, अप्पास गोगावे, शशांक पाटील, रतन दुलंगे, दर्शन साखरे सर्व भक्तगण शिष्य व अचलेर ग्रामस्थांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# 'जीडीसी अँड ए' परीक्षा २३ ते २५ रोजी, प्रवेशपत्रासाठी आवाहन

आरंभ मराठी | लातूर

लातूर(विमाका),दि.–२१: सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्थेमार्फत जीडीसी अँड ए परीक्षा २३ ते २५ मे, २०२५ रोजी येथील श्री. मारवाडी राजस्थान विद्यालय, शासकीय रूग्णालयासमोर, सिग्नल कँम्प, या परीक्षा केंद्रावर सकाळी १० ते ०१ आणि दुपारी ०२ ते ०५ या वेळेत घेण्यात येणार आहे. ज्या परीक्षार्थीना परीक्षेचे प्रवेशपत्र मिळालेले नाहीत अथवा मोबाईलव्दारे संदेश प्राप्त झालेले नाही अशा परीक्षार्थींनी स्वत:चा एक फोटो व पॅन कार्ड, निवडणूक मतदान ओळखपत्र, ड्रायव्हिंग परवाना, अनुषंगिक ओळखपत्राची एक झेरॉक्स प्रत सोबत घेऊन येथील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, प्रशासकीय इमारत, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथून प्रवेशपत्र प्राप्त करून


महाराष्ट्र शासन
विभागीय माहिती कार्यालय, लातूर
पत्ता:मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, जिल्हा परिषदजवळ, लातूर-४१३५१२ संपर्क : ०२३८२-२४८०००
वृत्त क्रमांक :०८ दि. २१ मे, २०२५

'जीडीसी अँड ए' परीक्षा २३ ते २५ रोजी ; प्रवेशपत्रासाठी आवाहन

लातूर(विमाका),दि.-२१: सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्थेमार्फत जीडीसी अँड ए परीक्षा २३ ते २५ मे, २०२५ रोजी येथील श्री. मारवाडी राजस्थान विद्यालय, शासकीय रूग्णालयासमोर, सिग्नल कँम्प, या परीक्षा केंद्रावर सकाळी १० ते ०१ आणि दुपारी ०२ ते ०५ या वेळेत घेण्यात येणार आहे. ज्या परीक्षार्थींना परीक्षेचे प्रवेशपत्र मिळालेले नाहीत अथवा मोबाईलव्दारे संदेश प्राप्त झालेले नाही अशा परीक्षार्थींनी स्वत:चा एक फोटो व पॅन कार्ड, निवडणूक मतदान ओळखपत्र, ड्रायव्हिंग परवाना, अनुषंगिक ओळखपत्राची एक झेरॉक्स प्रत सोबत घेऊन येथील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, प्रशासकीय इमारत, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथून प्रवेशपत्र प्राप्त करून घ्यावेत. अथवा परीक्षेच्या दिवशी एक तास अगोदर कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२४५१९३ किंवा ९९७०७१४८५५(राहुल काळे) या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन चिफ कंडक्टर जीडीसी अँड ए परीक्षा तथा जिल्हा उपनिबंधक यांनी केले आहे. परीक्षार्थींना कार्यालयाच्या ddr_ltr@rediffmail.com या ई-मेल आयडीवरही संपर्क साधता येईल, असे प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.
0000
इमेल : ddilatur@gmail.com X : @InfoDivLatur फेसबुकपेज : Divisional Information Office, Latur

घ्यावेत. अथवा परीक्षेच्या दिवशी एक तास अगोदर कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२३८२–२४५१९३ किंवा ९९७०७१४८५५(राहुल काळे) या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन चिफ कंडक्टर जीडीसी अँड ए परीक्षा तथा जिल्हा उपनिबंधक यांनी केले आहे. परीक्षार्थींना कार्यालयाच्या . या ई–मेल आयडीवरही संपर्क साधता येईल, असे प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य तथा सचिव गोरक्ष लोखंडे यांचा सत्कार



आरंभ मराठी | धाराशिव

महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य तथा सचिव गोरक्ष लोखंडे हे बुधवारी (दि.२१) धाराशिव जिल्हा दौऱ्यावर आले असता, शासकीय विश्रामगृह येथे मुक्ताई बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुक्ताई बहुद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ गायकवाड , भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष मेसा जानराव ,भीमशक्तीचे कार्याध्यक्ष संदीप अंकुशराव आदींची उपस्थिती होती .सामाजिक न्याय विभागातील ,नगरपरिषद ,जिल्हा परिषदेतील विविध योजनामध्ये गतिमानता आणून जिल्हाभरात योजना राबविण्यासाठी प्रशासनातील अधिकाऱ्यांना आदेशित करण्यासाठी यावेळी सुचविण्यात आले.

# धाराशिव येथे सैनिकी मुलांच्या वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया ५ जूनपासून सुरु होणार

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील गरजू व पात्र सेवारत सैनिक, माजी सैनिक, वीरनारी, माजी सैनिक विधवा तसेच इतर नागरिकांच्या मुला–मुलींकरिता इयत्ता ८ वी ते १२ वी, , डिप्लोमा,पदवी (वैद्यकीय व अभियांत्रिकीसह) व पदवीत्तर शिक्षण घेणाऱ्यांना सैनिकी मुलांच्या वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया ५ जून २०२५ पासून सुरू होणार आहे. ख्वाजा नगर, धाराशिव येथील होमगार्ड कार्यालयाच्या शेजारील वसतिगृहात विद्यार्थ्यांसाठी राहण्याची व भोजनाची उत्तम सोय उपलब्ध आहे. आजी व माजी सैनिकांच्या पाल्यांना त्यांच्या हुद्यानुसार सवलतीच्या दरात सुविधा दिल्या जातात.



तसेच वसतिगृहात जागा उपलब्ध असल्यासइतर पात्र नागरिकांच्या पाल्यांनाही प्रवेश दिला जातो. प्रवेशासाठी आवश्यक अर्ज व माहिती वसतिगृह अधिक्षकांकडे उपलब्ध आहे. इच्छुकांनी आपले अर्ज सैनिकी मुलांचे वसतिगृह, ख्वाजा नगर, धाराशिव येथे सादर करावेत,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी वसतिगृह अधिक्षकांशी मोबाईल क्रमांक ७३००२३१०५० वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# तुळजापुरात रविवारी मराठा समाज वधू-वर परिचय मेळावा, तयारी पूर्ण

आरंभ मराठी |तुळजापूर

तीर्थक्षेत्र तुळजापूरमध्ये रविवार, २५ मे रोजी मराठा समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वधू–वर परिचय मेळाव्याची जय्यत तयारी पूर्ण झाली असून, बुधवारी सायंकाळी येथील श्रीनाथ मंगल कार्यालयात संयोजन समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी मराठा समाज वधु –वर मेळाव्यासंदर्भात भोजन व्यवस्था,नोंदणी कक्ष, प्रमुख पाहुणे, सत्कार मुर्ती,मार्गदर्शक, बैठक व्यवस्था,नियोजन आदी विषयांवर अंतिम आढावा घेण्यात आला.तुळजापूरात होत असलेला या मेळाव्यासाठी नाव नोंदणी पूर्णतः निःशुल्क ठेवण्यात आली असून दुरवरच्या वधू–वरांच्या पालकांनी व्हाट्सअप माध्यमांचा उपयोग करून संयोजन समितीमधील सर्व पदाधिकाऱ्यांकडे मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातारा, नांदेड, गुलबर्गा, बिदर, लातूर,आटपाडी, सिंदूदुर्ग आदी ठिकाणांहून वधु –वर पालकांनी आपले परिचय पत्र पाठवून कच्ची नोंदणी करून घेतली आहे. मेळाव्यासाठी राज्यातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत आलेल्या परिचय पत्रावरुन पालक उत्स्फूर्तपणे या मेळाव्यात सहभागी होण्यास इच्छूक असल्याचे निदर्शनास येत आहे. या मेळाव्यासाठी जवळपास तीन ते चार हजार वधु–वर सहभागी होतील असा अंदाज संयोजकांनी व्यक्त केला आहे.



हा मेळावा येथील नळदुर्ग रोडवरील श्रीनाथ मंगल कार्यालयात होणार आहे.

या मेळाव्यास महाराष्ट्रातील मराठा समाज बांधव, वधू–वर मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.या बैठकीस संयोजन समितीमधील गणेश पुजारी प्रा. अभिमान हंगरगेकर,अशोक गायकवाड,उमाजी गायकवाड, उत्तम (नाना) अमृतराव, नागनाथ (भाऊ)भांजी,चंद्रकांत भांजी,अमोल निंबाळकर अण्णासाहेब कदम,नवनाथ पवार,राजू तांबे,अशोक ठोंबळ, संजय शिंदे,दत्तात्रय घाडगे, अशोक चव्हाण,लखन मुंडे, कमलाकर मुंडे,अर्जुन जाधव, सुहास साळुंके,हनुमंत भालेकर, गोरोबा लोंढे,राहुल जाधव,राम मुंडे,रमेश भोसले,विश्वास मोटे प्रा डॉ. टी.आर.बारबोले,राजेंद्र कदम,रमाकांत लोंढे आदी सदस्य उपस्थित होते.

# राज्यपालांकडून अधिकारी, कर्मचारी यांना दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा

आरंभ मराठी | मुंबई



राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी दहशतवाद विरोधी दिनानिमित्त राजभवनातील अधिकारी व कर्मचारी यांना दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा दिली. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.भारताचे दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांची पुण्यतिथी दहशतवाद विरोधी दिवस म्हणून पाळण्यात येते. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस. राममूर्ती यांसह राजभवनातील कर्मचारी व अधिकारी तसेच उपस्थित पोलीस अधिकारी व जवानांनी यावेळी दहशतवाद व हिंसाचार विरोधी प्रतिज्ञा घेतली. अहिंसा व सहिष्णुतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

आपलं धाराशिव....

गुरूवार दि.22 मे 2025

# शेतकऱ्यांना होती कर्जमाफीची आस;मात्र पुन्हा खासगी सावकारीचा आवळला जातोय फास

## कर्जमाफीचे आश्वासन हवेत विरल्यामुळे खरीप हंगामात बळीराजा संकटात





अभिजित साळुंके | आरंभ मराठी

लोहारा -राज्यातील महायुती सरकारने निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्यांना कर्जमाफीचे गाजावाजा करून आश्वासन दिले होते. यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये आशा निर्माण झाली होती. अनेकांनी सरकारच्या या घोषणांवर विश्वास टाकत बँकांचे कर्ज परतफेड करण्यास स्थगिती दिली. मात्र, कर्जमाफीची अंमलबजावणी अद्याप न झाल्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची भावना निर्माण झाली आहे. या स्थितीचा थेट परिणाम बँकांच्या कर्जवसुलीवर झाला आहे. ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर जिल्ह्यातील बळीराजा संकटात सापडला असून, खरीप हंगामात पैशांची जुळवाजुळव कशी करावी अशी चिंता त्याला सतावत आहे.

जिल्ह्यातील प्रमुख बँकांनी शेतकऱ्यांना मोठ्या पीककर्ज दिले होते; परंतु या कर्जाची वसुली ठप्प झाल्याचे चित्र आहे. बँकांकडून प्राप्त माहितीनुसार कोट्यवधी रुपयांचे कर्ज थकलेले आहे. ही रक्कम मागील वर्षभरात दिलेल्या पीककर्जाचे प्रमाण दर्शवते. प्रत्येक हंगामात, विशेषतः खरीप व रब्बी हंगामात शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषधे, पाणी, मजुरीसाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक करावी लागते. जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तींनी आणि अवकाळी पावसामुळे उत्पादनावरही परिणाम झाला आहे. त्यामुळे शेतकरी पीककर्जावरच पूर्णपणे अवलंबून असतो. अशा परिस्थितीत कर्जमाफीचे गाजर दाखवल्यामुळे कर्जमाफीची अंमलबजावणी अद्याप न झाल्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची भावना झाली आहे. शेतकऱ्यांनी कर्जफेड केलेली नाही. आता कर्जफेडीसाठी मात्र, सावकाराच्या दारात जाण्याची वेळ आली आहे. शेतकरीही तात्पुरती गरज भागविण्यासाठी खासगी सावकरांकडे जातात. त्यावेळची त्यांची गरजही भागविली जाते. मात्र त्यांचा व्याजदर खूपच असल्याने कर्ज फेडताना नाकीनऊ येते. त्यामुळे खबरदारी घेणे आवश्यक आहे. शक्यतो कर्ज न घेतलेलेच बरे, असे सांगितले जात असते.

### बँक अधिकाऱ्यांनाच शेतकऱ्यांचा सवाल

कर्ज परतफेड न झाल्याने नॉन परफॉर्मिंग ऍसेट खाते हे कर्ज परतफेड न झाल्याने अनेक बँकांची खाती एनपीए स्थितीत गेली आहेत. या परिस्थितीमुळे बँकांचा आर्थिक समतोल बिघडला असून, नवीन कर्जवाटप करण्याची क्षमता कमी होत चालली आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर नवीन पीककर्ज मिळणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरू शकते. सरकार कर्जमाफी करणार आहे, मग आम्ही कर्ज का भरायचे? असा थेट सवाल बँक अधिकाऱ्यांना केला जात आहे.

### हे दुटप्पी सरकार

या बोलबच्चन सरकारने निवडणुकीत सरकार आल्यावर शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करू असे आश्वासन दिले होते. राज्यातील शेतकरी या कर्जमाफी ची वाट पाहत होते. पण या सरकारने पदरी निराशा दिली. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. येणाऱ्या खरीप हंगामासाठी खते बियाणे यासाठी बळीराजाकडे पैसे नाहीत. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे.



-प्रवीण स्वामी
आमदार.

# विद्युतपुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात महावितरण अभियंत्यांना निवेदन



आरंभ मराठी |तुळजापूर

तुळजापूर शहरातील भिमनगर परिसरातील विद्युत पुरवठा गेल्या काही दिवसांपासून सतत खंडित होत आहे. या परीसरातील एलटी तारा जीर्ण (जुन्या) झाल्या असून याच्या भोवतालची झाडे-झूडपे हे या तारांवर पडून तुटून पडण्याची शक्यता आहे. तसेच सतत या तारांना आडे पडत आहेत, या तारा या परीसरातील काही रहिवासींच्या घरावरून गेल्या आहेत. यामूळे येथील नागरिकांना धोका निर्माण होत आहे. जर या तारा पासून कांही अपघात झाल्यास यास जबाबदार महावितरण कंपनी राहील त्यामुळे येथील एलटी तारा बदलून येथे केबल वायर टाकण्यात यावे, तसेच तारा भोवतालची वाढलेली झाडे-झूडपे येत्या पावसाळ्या अगोदर काढून घ्यावी. तसेच या भागाला नवीन ट्रान्सफॉर्मर (डि.पी.) द्यावा जेणेकरून विद्युत पुरवठा खंडित होवून नागरीकांना त्रास होणार नाही. अशा मागणीचे निवेदन साहाय्यक अभियंत्यास देण्यात आले. या निवेदनावर सागर कदम यांच्यासह किरण कदम, संजय कदम, मिलिंद कदम, सोमनाथ पांडागळे, राहुल सोनवणे, अक्षय कदम, चेतन कदम, गोकुळ कदम, सुधिर सोनवणे, नागेश कदम, बल्ली कदम रोहित कदम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राजमाता अहिल्यादेवी त्रिशताब्दी जयंतीनिमित्त चोराखळी येथील पापनाश मंदिरात स्वच्छता अभियान

## पापनाश मंदिरात भाजपचा स्वच्छतेचा संकल्प

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव - राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या आजोळ असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील चोराखळी येथील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या आणि अहिल्यादेवींनी स्वतः स्थापन केलेल्या श्री पापनाश मंदिर परिसरात भाजपच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, ॲड. नितीन भोसले, खंडेराव चौरे, विकास बारकुल, इंद्रजित देवकते, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष राजसिंहा राजेनिंबाळकर, डॉ. गोविंद कोकाटे, मदन बारकुल, दत्तात्रय सोनटक्के, मकरंद पाटील, शिवाजी गिड्डे, खंडेराव मैंदाड, सोमनाथ बारकुल हे भाजपचे प्रमुख पदाधिकारी



व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी यावेळी सांगितले की, ''अहिल्यादेवी होळकर यांनी केवळ मंदिर बांधणीच नव्हे तर समाजकारणातही व्यापक योगदान दिले. चोराखळीतील पापनाश मंदिर आजही त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाचा साक्षीदार आहे. त्यांच्या त्रिशताब्दी वर्षात या मंदिराचा सन्मान आणि परिसराची स्वच्छता राखणे हे आपले कर्तव्य आहे. या अभियानाच्या माध्यमातून संस्कार, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

# दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा सत्कार



आरंभ मराठी | धाराशिव

भारतीय जनता पार्टीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा दैनिक आरंभ मराठीच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. आरंभ मराठीचे संपादक चंद्रसेन देशमुख, कार्यकारी संपादक सज्जन यादव, छायाचित्रकार आरिफ शेख, कार्यालयीन प्रतिनिधी आकाश तांबे, विजयकुमार पवार, खंडू राऊत, मुकुंद घाडगे आदींच्या हस्ते दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

# दलित ऐक्य कृती समितीचे प्रशासनाला निवेदन

## भूमिहीन कुटूंबांना न्याय द्या



आरंभ मराठी | धाराशिव

महाराष्ट्रातील भूमिहीन कुटुंबांना (जात विरहित) सरसकट पाच एकर पडीक गायरान जमीन मिळाली पाहिजे किंवा इतर शेतकऱ्यांप्रमाणे भूमीहीन कुटुंबांना पेन्शन योजना लागू करण्यात यावी या मागणीचे निवेदन भारतीय दलित ऐक्य कृती समितीच्या वतीने मंगळवारी (दि.२०) निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र अध्यक्ष तथा धाराशिव जिल्हा अध्यक्ष डॉ. रमेश बनसोडे, प्रदेश संपर्कप्रमुख जनार्दन वाळवे, महिला प्रदेश उपाध्यक्ष सौ. विद्याताई नाईकवाडी, जिल्हा उपाध्यक्ष राधाताई शिंगाडे, ज्येष्ठ साहित्यिक तु. दा. गंगावणे, अशोक व्हटकर, अमोल सदाफुले, पुतळा आई कांबळे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व भूमीहीन नागरिक उपस्थित होते.

# सर्वाधिक निधी प्राप्त करणाऱ्या स्टार्टअपचे हब मुंबई

आरंभ मराठी | मुंबई

स्टार्टअप आणि उद्योगांना आर्थिक साहाय्य देण्यासाठी फिनटेक धोरण तयार करणारे महाराष्ट्र पहिले राज्य आहे. देशातील सर्वाधिक निधी प्राप्त करणाऱ्या स्टार्टअपचे मुंबई हब बनले आहे. देशाच्या एकूण स्टार्टअप्सपैकी २४ टक्के स्टार्टअप्स महाराष्ट्रात असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. गोरेगाव येथील नेस्को सेंटर येथे सीएसआयआर आणि तीन प्रमुख वैज्ञानिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्टार्टअप कॉन्क्लेव २०२५ मध्ये उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. श्री. शिंदे यावेळी म्हणाले, महाराष्ट्र स्टार्टअप्सच्या बाबतीत संपूर्ण देशात क्रमांक एकवर असून २०२५ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, महाराष्ट्रात २६ हजार ६८६ स्टार्टअप्स आहेत. जे देशातील एकूण स्टार्टअप्सच्या २४ टक्के आहेत. गुंतवणूकदार आणि व्हेंचर कॅपिटल फंड्सच्या उपलब्धतेमुळे मुंबई स्टार्टअप्ससाठी सर्वात योग्य ठिकाण बनत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्यात 'महाराष्ट्र स्टार्टअप वीक', 'मुंबई फिनटेक हब' आणि 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना' तयार केल्या आहेत. त्यामुळे मुंबई हे आर्थिक आणि तांत्रिक इनोव्हेशनचे केंद्र बनले आहे. फिनटेक, ई-कॉमर्स, हेल्थटेक, एडटेक आणि डीप टेक स्टार्टअप्स झपाट्याने विकसित होत असून देशातील सर्वाधिक म्हणजे २७ युनिकॉर्न कंपन्या महाराष्ट्रात आहेत.मुंबई हे देशातील सर्वाधिक निधी प्राप्त करणारे स्टार्टअप हब आहे. या वर्षी स्टार्टअप्सनी एकूण ३.७ बिलियन डॉलर्सचा निधी प्राप्त केला.

# सैनिकांच्या शौर्याचा सन्मान म्हणून आज भूममध्ये तिरंगा रॅली

आरंभ मराठी | भूम

भारत-पाकिस्तान युद्धामध्ये भारतीय जवानांनी उत्तमरीत्या कामगिरी पार पाडून देशसेवेसाठी दक्ष राहिले त्यांना प्रोत्साहन म्हणून आज (दि.२२) सकाळी १० वा.भूम शहराच्या वतीने भारतीय सैनिकांच्या शौर्याच्या प्रोत्साहनार्थ तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. सदर तिरंगा रॅलीसाठी तालुक्यातील माजी सैनिक व राष्ट्रप्रेमी नागरिक, युवक, युवती, विद्यार्थी, व्यापारी, महिला यांनी नगरपरिषद भूम जवळ जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहुन राष्टाप्रती असलेले प्रेम व्यक्त करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# ढगांची गर्दी आणि पावसाची दमदार एन्ट्री



धाराशिव जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पावसाळ्याप्रमाणे ढग दाटून येतात आणि जोरदार पाऊस बरसतो. बुधवारी सायंकाळी कळंब तालुक्यात असे चित्र निर्माण झाले होते.छायाः गजानन तोडकर

# श्री तुळजाभवानी देवींच्या सिंहासन पूजेची मे महिन्याची ऑनलाईन नोंदणी सुरु

आरंभ मराठी | धाराशिव

महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या सिंहासन पूजेची मे २०२५ मधील नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने सुरू झाली असून,भाविकांनी अधिकृत संकेतस्थळावरून आपली नोंदणी करावी असे आवाहन मंदिर संस्थानने केले आहे. महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश,कर्नाटक,तेलंगणा आणि इतर राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक कुलाचार व कुलधर्मासाठी तुळजापूरला येतात. श्री तुळजाभवानी देवीची सिंहासन पूजा ही अत्यंत श्रद्धेने केली जाणारी पूजा असून, तिच्या नोंदणीसाठी :/ http://shrituljabhavanitempletrust.org/. या अधिकृत संकेतस्थळावर 'सिंहासन पूजा पास बुकिंग' या मेन्यूवर क्लिक करून, :/ https://shrituljabhavanimataseva.org/. या लिंकवर जाऊन नोंदणी करता येईल. नोंदणीची वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे:नोंदणी



कालावधी : २१ मे २०२५ सकाळी १० वाजता ते २६ मे २०२५ सकाळी १० वाजेपर्यंत.प्रथम सोडत: २७ मे रोजी सकाळी १०.३० वाजता द्वारे कळविण्यात येईल.प्रथम फेरीचे पेमेंट: २७ मे सकाळी १०.३० ते २८ मे सकाळी १० वाजेपर्यंत राहील.व्दितीय सोडत (आवश्यकतेनुसार) : २८ मे रोजी सकाळी १०.३० वाजता. व्दितीय फेरीचे पेमेंट : २८ मे सकाळी १०.३० ते २९ मे सकाळी १० वाजेपर्यंत.तृतीय सोडत (उर्वरित असल्यास) २९ मे रोजी सकाळी १०.३० वाजता.तृतीय फेरीचे पेमेंट : २९ मे सकाळी १०.३० ते ३० मे सकाळी १० वाजेपर्यंत.अंतीम यादी प्रसिद्धी: ३० मे २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहणार आहे. सर्व भाविक भक्त,महंत,पुजारी,सेवेकरी आणि नागरिकांनी सिंहासन पूजेच्या नोंदणीची माहिती लक्षात घेऊन वेळेत नोंदणी करावी,असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे.

# पशुधनच्या सहायक आयुक्त पदाच्या ३११ जागांची भरती

- पशुसंवर्धन विभाग अधिक सक्षम करण्यासाठी
- पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचे ठोस निर्णय

आरंभ मराठी | मुंबई

पशुसंवर्धन विभाग अधिक सक्षम होण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विविध ठोस निर्णय घेतले आहेत. पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदांपाठोपाठ आता सहायक आयुक्त, पशुसंवर्धन या संवर्गातील ३११ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला असून या पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) जाहिरात प्रसिद्ध करून प्रक्रिया सुरू केली आहे. पशुसंवर्धन विभागाने पूर्ण क्षमतेने काम करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी एकापाठोपाठ एक असे महत्वाचे निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. विभागातील रिक्त पदांमुळे पशुपालक, शेतकरी यांना सेवा देण्यास येणारी अडचण लक्षात घेऊन विभागातील आवश्यक पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी त्यांनी पशुसंवर्धन सेवा गट अ मधील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदे भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणी पत्र सादर करण्यात आले.त्यानंतर आता प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करून महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट अ या संवर्गातील सहायक आयुक्त, पशुसंवर्धन ही ३११ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला असून तसे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवले. या भरतीची प्रक्रिया वेगाने होण्यासाठी श्रीमती मुंडे यांनी पाठपुरावा केला.एम पी एस सी ने सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन या संवर्गातील ३११ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली असून २० जून २०२५ पर्यंत अर्ज मागविले आहेत.कामास येणार गतीही भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून पशुसंवर्धन विभागाला सक्षम आणि नवीन अभ्यासू अधिकारी मिळणार आहेत. त्यातून ग्रामीण भागातील पशुसंवर्धन विभागाचे काम आणखी वेगाने व पूर्ण क्षमतेने होण्यास मदत होणार असून पशुपालकांना चांगल्या दर्जाची सेवा मिळणार असल्याचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.